# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १५५-२२** **दिनांक :- ३०/०५/२०२२**

## जबरी चोरी व मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/०५/२०२२ रोजी २२.०० वा. सुमारास श्रीरामनगर ते धानिबाई नगरचे दरम्यान पेल्हार रोड, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी श्री. दिपक प्रमोद झा, वय-३३ वर्षे, रा. श्रीरामनगर, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर हे पायी चालत जात असतांना एका अज्ञात मोटार सायकलस्वाराने त्यांचेजवळ येवुन त्यांचे हातातील मोबाईल फोन जबरीने खेचुन घेवुन जबरी चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ४५०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३९२ प्रमाणे दिनांक २३/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे दिनांक १४/०५/२०२२ रोजी ०८.३० वा. ते १५/०५/२०२२ रोजी ०८.३०वा. चे दरम्यान जकरीया मस्जिद जवळ, के.के. कंम्पाऊंड, वाकणपाडा, नालासोपारा(पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोटार सायकल क्रं.एम.एच.०३/डी.बी.८६५३ हि उभी करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी नामे. श्री. अधमअली अकबरअली शाह, वय-२४ वर्षे, रा.साकीनाका, अंधेरी(पु.), मुंबई-७२, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ४२०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दि.१५/०५/२०२२ रोजी गुन्हा दाखल आहे.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देवून तांत्रिक माहिती गोळा करुन व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे. १) आकाश जितेश शेट्टी, रा. घासकोपरी, चंदनसादर, विरार (पु.), ता. वसई, जि. पालघर, २) अनिकेत सुरेश पाशी, रा. वसई फाटा, ता. वसई, जि. पालघर यांना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचेकडून एक मोटार सायकल व एक मोबाईल फोन असा एकुण-४०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.